# कोरुगेटेड बॉक्स उत्पादक अडचणीत

पुणे, २४ मार्च/ प्रतिनिधी

कोरुगेटेड पॅकेजिंग उद्योग अडचणीत सापडला आहे. या उद्योगाचा महत्त्वाचा कच्चा माल म्हणजे क्राफ्ट पेपरमध्ये नुकतीच अभूतपूर्व दरवाढ झाली आहे. त्यामुळे कोरुगेटेड पॅकेजिंग तब्बल २५ टक्क्यांनी महागले असून, पेपर मिल्स येणाऱ्या काही आठवड्यांमध्ये आणखीही दरवाढ करण्याच्या बेतात आहेत.

या परिस्थितीत आणखी भर पडून या उद्योगातील इतरही काही निर्णायक गोष्टींच्या किमतीत फारच मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. गेल्या वर्षभरात स्टार्चच्या किमती तब्बल दुपटीने वाढल्या आहेत.

शिवण्याच्या दोरीच्या किमतीही साधारण ४० टक्क्यांनी वाढल्या आहेत आणि स्टीलच्या वाढलेल्या किमती हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. त्याशिवाय लेबरच्या किमतीतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन आयुष्यातील जवळजवळ सर्वच उत्पादनांची वाहतूक आणि त्याचे वितरण यासाठी कोरुगेटेड पॅकेजिंगची गरज असते. मग ते दूध असो, फळे असो की भाजीपाला, इंजिनिअरिंग वस्तू, वस्त्रोद्योग, कन्झ्युमर ड्युरेबल्स, औषधे या सर्वांसाठी ते गरजेचे असते. हा उद्योग संपूर्णतः पुनर्वापरातील फायबरवर आधारित आहे आणि देशातील पॅकेजिंगच्या गरजांची तो पूर्तता करत आला आहे.

इंडियन कोरुगेटेड केस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयसीसीएमए)चे अध्यक्ष किरीट मोदी म्हणाले, की आतापर्यंतच्या फ्रॅगमेंटेड मॅन्युफॅक्चरिंग प्रक्रियेमध्ये सुधारणा करून देशात नुकतीच आधुनिक आणि नवीन तंत्रज्ञान दाखल केले गेले आहे. त्यातून संपूर्ण ऑटोमॅटिक पद्धतीने निर्मिती केली जाते आणि पॅकेजिंग उद्योगामध्ये जगभरात तोच मापदंड आहे. या उद्योगातील एक विभाग इंडियन कोरुगेटेड केस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन या बॅनरखाली एकत्र आला आहे. भारतीय बाजारपेठेमध्ये हे आधुनिक तंत्रज्ञान दाखल करण्यासाठी ज्या युनिट्सने नुकतीच महत्त्वपूर्ण गुंतवणूक केली आहे त्याचे प्रतिनिधित्व आयसीसीएमए करते. ■